# प्रेसनोट

दिनांक ०२.०८.२०१८

**श्री. विजय वामनराव जोशी, वय 55 वर्ष व्यवसाय नोकरी- अतिरिक्त पदभार कनिष्ठ लिपीक, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेंबळी ता.जि. उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांचे पे-फिक्सेशन करुन, ऐरिअर्स काढणे, दोन वर्षाचे १६ नं.फॉर्म देणे, अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठवणे, सहा महि-न्याचा प्रवास भत्ता काढणे, तक्रारदार यांचे सोसायटीचे कपात केलेले हप्ते भरणे करिता ९००० रुपये लाच स्विकारल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली, त्याची थोडक्यात हकिगत अशी की, तक्रारदार यांची प्राथमिक आरोग्य केंद्र, बेंबळी येथुन प्राथमिक आरोग्य केंद्र, केशेगाव येथे बदली झालेली असल्याने त्यांचे पे-फिक्सेशन करुन, ऐरिअर्स काढणे, दोन वर्षाचे १६ नं.फॉर्म देणे, अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठवणे, सहा महि-न्याचा प्रवास भत्ता काढणे, तक्रारदार यांचे सोसायटीचे कपात केलेले हप्ते भरणे या कामासाठी श्री. विजय जोशी, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेंबळी हे ९०००/- रुपये लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे व श्री. व्ही.आर. बहिर, पोलीस निरीक्षक यांनी तक्रारीची शहानिशा करुन अे.सी.बी युनीट टिमच्या सहाय्याने सापळा रचुन आज दि. ०२/०८/२०१८ रोजी श्री. विजय वामनराव जोशी, वय 55 वर्ष व्यवसाय नोकरी- अतिरिक्त पदभार कनिष्ठ लिपीक, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेंबळी ता.जि. उस्मानाबाद यानी वर नमूद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन ९०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना शासकिय विश्रामगृहाचे पाठीमागे, बी.एण्ड सी ऑफीस जाणारे रोडवर, उस्मानाबाद येथे रंगेहात पकडण्यात आले. यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास श्री. बी.व्ही. गावडे, पोलीस उप-अधीक्षक , अॅन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

अॅन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनिवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे मोबाईल अॅप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

प्रति,

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

02/08/18

(बी. व्ही. गावडे)

पोलीस उप अधीक्षक,

अॅन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.